प्रेसनोट दि. ०१/०७/२०२१

ठाणे शहर वाहतुक शाखेचे विठ्ठलवाडी उपविभागाचे पोलीस हवालदार यांना अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागाने लाच स्विकारतांना घेतले ताब्यात

| | | |
|---|---|---|
| अॅन्टी करप्शन ब्युरो/घटक | :— | ठाणे |
| गुन्हा नोंद कमांक | :— | विठ्ठलवाडी पो.स्टे |
| लोकसेवकाचे नांव व कार्यालय | :— | श्री.गणेश दयाराम चौधरी, पोहवा/३७२४ शहर वाहतुक शाखा, उपविभाग विठ्ठलवाडी ठाणे शहर |
| मागितलेली लाचेची रक्कम | :— | ७००/—रू. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | :— | तडजोडीअंती ५००/—रू.लाचेची रक्कम स्विकारली |
| थोडक्यात हकीगत | :— | यातील तक्रारदार यांचे पत्नीचे नावावर असलेली तिनचाकी एप्पे मालवाहतुक टेम्पो क्रमांक एम.एच.०५ डी.झेड ७८२६ ही गॅस सिलेंडर सप्लायसाठी वापरली जाते. लोकसेवक यांनी सदरची टेम्पो व्यवसायासाठी चालवण्यासाठी दरमहा पैसे द्यावे लागतील असे सांगुन व पैसे नाही दिले तर तक्रारदार यांचे गाडीवर केस करून त्यांना त्रास देईन '' असे सांगुन, तक्रारदार यांना भिती दाखवुन ७००/—रूपये लाचेची मागणी केली होती. त्यामुळे तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे यांचेकडे दि. ३०/०६/२०२१ रोजी तक्रार नोंदवली होती.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०१/०७/२०२१ रोजी पडताळणी केली असता नमूद लोकसेवक यांनी ७००/—रू.लाचेची मागणी करून तडजोडीअंती ५००/—रू. लाच स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाल्यावरून असीबी ठाणे युनिटने सापळयाचे आयोजन करून लोकसेवक आलोसे श्री.गणेश दयाराम चौधरी, पोहवा/३७२४ ठाणे शहर वाहतुक शाखा, उपविभाग विठ्ठलवाडी यांना तक्रारदार यांचेकडून तडजोडीअंती ५००/—रू. लाचेच्या रक्कमेचा स्विकार केल्यानंतर दिनांक ०१/०७/२०२१ रोजी १३:१०वा. शहर वाहतुक शाखा, उपविभाग विठ्ठलवाडी चे समोरील ओटी रोडवर रंगेहात पकडण्यात आले. |

**मार्गदर्शन अधिकारी— मा.श्री.डॉ.पंजाबराव उगले, सो.पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा—या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---

१) संपर्क पत्ता :—लाप्रवि, ठाणे मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४००६०१
२) संकेत स्थळ :—acbmaharashtra@mahapolice.gov.in
३)ई—मेल आयडी :—spacbthane@mahapolice.gov.in
४) अॅप्लीकेशन :—acbmaharashtra.net
५) टोल फ्री क्र. :— १०६४
६)दुरध्वनी क्रमांक :—०२२—२०८१३५९९

पोलीस निरीक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे

Satil
**सुषमा छबुराव पाटील**
**पोलीस निरीक्षक**
**अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे**

Scanned with CamScanner